महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र.३७४(२)/स्थापत्य/२०१९/१४-ब दिनांक- ५ ऑक्टोबर, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ च्या मुलाखत कार्यक्रमाबाबत.**

**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०५/२०१९ व अधिसूचना क्रमांक १७/२०१९.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागांतील सहायक कार्यकारी अभियंता , स्थापत्य, गट -अ, सहायक अभियंता, स्थापत्य, गट-अ व सहायक अभियंता, स्थापत्य, गट-ब श्रेणी -२ तसेच मृद व जलसंधारण विभागातील उपविभागीय जलसंधारण अधिकारी, स्थापत्य, गट-अ व जलसंधारण अधिकारी , स्थापत्य, गट-ब या पदांकरीता दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा — २०१९ च्या लेखी परीक्षेचा सुधारीत निकाल दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. मुख्य परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या ३६६४ उमेदवारांच्या **मुंबई आणि औरंगाबाद** येथील पहिल्या टप्प्यातील मुलाखती खालील प्रमाणे घेण्यात येणार आहेत.

| **मुलाखत केंद्र** | **मुलाखत दिनांक** |
|---|---|
| **मुंबई** (टप्पा-०१)<br>एकूण उमेदवार २२१/२२१ | २० ते २२ ऑक्टोबर, २०२१ |
| **औरंगाबाद** (टप्पा -०१)<br>एकूण उमेदवार -२४०/६८० | ८ ते ११ नोव्हेंबर, २०२१ |

३. सदर मुलाखतीकरिता उमेदवारांची संख्या जास्त असल्याने ही प्रक्रिया दोन टप्प्यात राबविण्यात येणार आहे.

४. मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येत असून त्यामध्ये मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ नमुद करण्यात येईल.

५. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोगाकडून मुलाखतपत्रावर दिलेल्या सूचनांचे तसेच स्थानिक प्राधिकरणाकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांचे पालन करणे अनिवार्य राहील.

**ठिकाण- मुंबई.**

**उपसचिव , परीक्षा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**